# Washim District Police

**Nature of Work** :- **Narcotic drug Mephedrone (MD) arrested for possession and sale**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **23/12/2022**

**Brief of the work done :-**

अंमली पदार्थ मेफेड्रॉन (MD) साठवणूक व विक्री करणाऱ्यांना अटक ; जिल्हयातील पहिलीच कारवाई.

## मानोरा येथे अमली पदार्थाचा व्यापार ; तीन आरोपी विरुद्ध गुन्हा

- ■दोघांना अटक,एक फरार
- ■डी.बी.पथकाची धडक कारवाई
- ■५२ हजाराचा मुद्देमाल जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ■ २१ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता चे दरम्यान येथील बसस्थानकवर संशयीतरित्या आढळलेल्या तीन युवकाची गस्ती वर असलेल्या डीबी पथक पोलिसांनी चौकशी आणि झडती घेतली असता त्यांचे कडे ५२ हजार किमतीचे अमली पदार्थ आढळली.त्यांना लगेच अटक करून त्याचे विरुद्ध सकाळी २२ डिसेंबर रोजी सखोल चौकशी अंती गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस सुत्राकडून प्राप्त माहिती वरून सविस्तर असे की, फिर्यादी पोलीस हवालदार मयुरेश तिवारी यांनी फिर्याद दिली की, २१डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता चे दरम्यान सहायक पोलीस निरीक्षक महेश कुचेकर यांचे सोबत डी. बी.पथक हे पोलीस वाहनाने गस्त घालत असताना येथील बस स्थानकावर संशयीत दोन जन बसले होते.त्यांचे हाव भावा वरून त्यांचेकडे काही आक्षेपार्ह वस्तू आहे असा संशय असल्याने त्यांचे कडे गेलो असता ते पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना पोलीस जमादार गणेश जाधव,बालाजी महल्ले यांनी ताब्यात घेतले. त्यांची अंग झडती घेतली असता त्यांचे कडे गुंगीकारक औषधी आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ (अमली पदार्थ) आढळले. त्याची किंमत सुमारे ५२ हजार एवढी आहे.

त्यांना तात्काळ पोलीस स्टेशनमध्ये आणले. वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शना खाली पंचनामा केला आणि कलम ८ सी,२१ बी.अमली पदार्थ अधिनियम १९८५ नुसार आरोपी पवन राऊत रा. सोमठाणा, मो.फैजान मो.निसार शेख रा.दिग्रस, मनोज राठोड रा. कारंजा यांचे विरुद्ध गुन्हा दखल केला. पैकी मनोज राठोड हा आरोपी फरार आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, उप विभागीय पोलीस अधिकारी जगदीश पांडे,पोलीस निरीक्षक ब्रह्मदेव शेळके यांचे मार्गदर्शना खाली सहायक पोलीस निरीक्षक महेश कूचेकर, डी.बी. पथकाचे गणेश जाधव,मयुरेश तिवारी,बालाजी महल्ले, बन्सी चव्हाण यांनी केली.(श.प्र.)